उजनी प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील पुनर्वसित गावठाण मौजे गणेशवाडी व शिंपोरा येथील नागरी सुविधा कामास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१४/प्र.क्र.४८/र-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १४/०२/२०१८

वाचा -

१) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र: आरपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि.१/८/२००९
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र: विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५/५/२००९
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र: संकिर्ण २०११/प्र.क्र.८० (भाग-२)/र-८, दि. २५/०७/२०१३
४) वित्त विभाग शासन निर्णय क्र: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि. १७/०४/२०१५
५) विभागीय आयुक्त, पुणे यांचे आदेश क्र.पुनर्व/कावि-४/५८६/२००८, दि.३/२/२००९
६) विभागीय आयुक्त, पुणे यांचे आदेश क्र.पुनर्व/कावि-४/८०/२००९, दि.२४/२/२००९
७) विभागीय आयुक्त, पुणे यांचे आदेश क्र.पुनर्व/कावि-४/२५१/२००९, दि.२७/७/२००९
८) विभागीय आयुक्त, पुणे यांचे आदेश क्र.पुनर्व/कावि-४/२४३/२००९, दि.५/८/२००९
९) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र: पुनर्व/कावि-५/२१०/२०१३, दि.२८/७/२०१४
१०) महसूल व वन विभाग शासनपत्र क्र.अर्थसं-२०१४/प्र.क्र.४८/र-८, दि.५/१२/२०१४
११) महसूल व वन विभाग शासनपत्र क्र.अर्थसं-२०१४/प्र.क्र.४८/र-८, दि.१३/०४/२०१५
१२) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र: पुनर्व/कावि ३/१६००/२०१७, दि.१६/१०/२०१७.

प्रस्तावना -

उजनी प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील मौजे गणेशवाडी व शिंपोरा या गावठाणातील नागरी सुविधा कामांना विभागीय आयुक्त, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.५, ६, ७ व ८ येथील आदेशान्वये एकूण ६ नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. तथापि, प्रत्यक्षात निविदा कार्यवाहीदरम्यान दरसूची बदलल्याने जादा दराने निविदा स्विकृती व कार्यक्षेत्रिय आवश्यकतेनुसार मूळ कामामध्ये नवीन बाबींचा समावेश करुन सन २०११-१२ व सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रके सुधारित करण्यात आल्याने ५ कामांच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. त्यानुसार रु. ५,५१,९३,०५०/- एवढया सुधारित अंदाजपत्रकीय किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२८/७/२०१४ च्या येथील पत्रान्वये शासनास केली होती. सदर प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करुन पुनश्च दि.१६/१०/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.४.२०१५ अन्वये निर्गमित वित्तीय अधिकार नियम, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ६ परिच्छेद

क्र.२७ (अ) अनुसार योजना किंवा प्रस्तावाच्या संदर्भात सुधारित अंदाजातील आधिक्य सुरवातीस मंजूर केलेल्या अंदाजित खर्चाच्या १५ % पेक्षा अधिक असल्यास वित्त विभागाच्या पूर्वसंमतीनंतर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार प्रशासनिक विभागास आहेत. त्यानुसार वित्त विभागाच्या पूर्वसंमतीनंतर रु. ५,५१,९३,०५०/- इतक्या सुधारित अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय -

त्यानुसार, उजनी प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील मौजे गणेशवाडी व शिंपोरा या गावठाणांमधील सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद नागरी सुविधांच्या ५ कामांच्या एकूण रुपये ५,५१,९३,०५०/- (अक्षरी रुपये पाच कोटी एक्कावन्न लक्ष त्यानऊ हजार पन्नास फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यता आदेशातील अटींच्या अधिन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.४.२०१५ अन्वये निर्गमित वित्तीय अधिकार नियम, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ६ परिच्छेद क्र.२७ (अ) अनुसार प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३३४/२०१७/व्यय-१०, दि.१२/१/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१३०६१६३७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.02.14 13:11:22 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) पुणे विभाग, पुणे
२. उप आयुक्त (पुनर्वसन), पुणे
३. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, अहमदनगर
४. अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर
५. कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)

८. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर/अहमदनगर
९. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), अहमदनगर
१०. वित्त विभाग, कार्यासन व्यय-१०, अर्थसंकल्प-६, मंत्रालय, मुंबई-३२.
११. नियोजन विभाग,कार्यासन १४७५, मंत्रालय, मुंबई ३२.
१२. सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यासन इमा-३, मंत्रालय, मुंबई
१३. महसूल व वन विभाग, ब-१, पी.ए.सी.कार्यासन, मंत्रालय, मुंबई ३२.
१४. निवडनस्ती कार्यासन र-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.४८/र-८, दि.१४/०२/२०१८ सोबतचे विवरणपत्र

उजनी प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान नागरी सुविधा कामांचा तपशील.

अ क्र	पुनर्वसित गावाचे नाव	नागरी सुविधा काम	सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये)
१)	गणेशवाडी	खेड ते गणेशवाडी पोहोच रस्त्यावरील सा.क्र.१/३५० येथे पूर्वी बांधलेल्या गाडी रस्ता पुलासाठी विंगवॉल बांधकाम करणे	२२,९२,८७०/-
२)	गणेशवाडी	गणेशवाडी ते भांबोरा पोहोच रस्त्यावरील सा.क्र.०/५७० येथे पूर्वी बांधलेल्या गाडी रस्ता पुलासाठी विंगवॉल बांधकाम करणे	३६,९९,६२०/-
३)	शिंपोरा	खेड-भिगवण राज्य रस्ता ते नवीन गावठाण शिंपोरा सा.क्र.३/०० ते ३/६०० पोहोच रस्ता तयार करणे व त्यावरील नलिका मोरी बांधकाम करणे	६१,२५,५७०/-
४)	शिंपोरा	खेड-भिगवण राज्य रस्ता ते नवीन गावठाण शिंपोरा सा.क्र.३/६०० ते ४/००० पोहोच रस्ता व पाईप नलिका मोरी बांधकाम करणे	२,९१,०४,९९०/-
५)	शिंपोरा	खेड-भिगवण राज्य रस्ता ते नवीन गावठाण शिंपोरा पोहोच रस्त्यावर सा.क्र.३/७४० येथे गाडीरस्ता पूल व डाव्या आणि उजव्या बाजूचे विंगवॉल बांधकाम करणे	१,३९,७०,०००/-
		एकूण	**५,५१,९३,०५०/-**

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.02.14 13:11:42 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन